Maharashtra State Board of Secondary & Higher Secondary Education
Kolhapur Divisional Board
Kolhapur-416004

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
कोल्हापूर विभागीय मंडळ,
कोल्हापूर - ४१६ ००४

Ph No. 0231-2696101/2/3 WebSite : www.sscboardkolhapur.in Email: divsec.kop@gmail.com

क्र.कोविमं/माध्य/उमा/३८६२
दिनांक : १८/१२/२०२४

प्रति,
प्राचार्य व मुख्याध्यापक,
सर्व मान्यताप्राप्त शाळा व कनिष्ठ महाविद्यालय,
सातारा, सांगली, कोल्हापूर.

**विषय :- इ. १० वी व इ.१२ वी परीक्षा फेब्रु -मार्च २०२५ साठी मुख्याध्यापक व प्राचार्य यांनी करावयाच्या कार्यवाहीबाबत.**

**संदर्भ:- १) क्र.कोविमं/माध्य/उमा/परीक्षा-३७५४ दि.०६/१२/२०२४.**
**२) प्राचार्य व मुख्याध्यापक यांच्या सहविचार सभेत देण्यात आलेल्या सूचना**

उपरोक्त संदर्भिय विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, मा.अध्यक्ष, राज्यमंडळ, पुणे यांच्या निर्देशानुसार मुख्याध्यापक व प्राचार्य यांची जिल्हा शिक्षणाधिकारी (माध्य.) यांच्या समवेत सातारा जिल्ह्यामध्ये दि.११/१२/२०२४, सांगली जिल्ह्यामध्ये दि. १२/१२/२०२४ व कोल्हापूर जिल्ह्यामध्ये दि.१७/१२/२०२४ रोजी इ.१० वी व इ.१२ वी परीक्षा फेब्रु -मार्च २०२५ बाबत ऑफलाईन सहविचार सभा आयोजित करण्यात आल्या होत्या. सदर सभेमध्ये इ.१० वी व इ.१२ वी परीक्षा फेब्रु-मार्च २०२५ परीक्षेसंदर्भात मुख्याध्यापक, प्राचार्य, शिक्षक, विद्यार्थी व पालक यांचे स्तरावर करावयाच्या कार्यवाही संदर्भात सविस्तर सूचना देण्यात आलेल्या आहेत त्यानुसार पुढीलप्रमाणे कार्यवाही करावी.

१) जिल्हास्तर सहविचार सभेमध्ये दिलेल्या सूचनांनुसार या पत्रासोबत PPT पाठविण्यात येत आहेत. त्याचे अवलोकन करुन आवश्यक ती कार्यवाही विहित वेळेत करण्यात यावी.

२) शाळा व कनिष्ठ महाविद्यालय स्तरावर विद्यार्थ्यांची अभ्यासाची उजळणी घेणे, सराव घेणे व उद्बोधन वर्ग घेणे या संदर्भात नियोजन करावे.

३) इ.१०वी व इ.१२वी परीक्षेस प्रविष्ट होणारे विद्यार्थी, पालक, शिक्षक यांची बैठक दि.२०/१२/२०२४ ते दि.२४/१२/२०२४ या कालावधीत कोणत्याही एका दिवशी आयोजित करुन PPT च्या सहाय्याने योग्य त्या सूचना देण्यात याव्यात. तसेच कॉपीमुक्त अभियानाबाबत उद्बोधन करावे. या बैठकीचे उपस्थितीपत्रक व इतिवृत्त जतन करुन ठेवावे आणि वरिष्ट अधिकाऱ्यांनी मागणी केल्यास तात्काळ उपलब्ध करुन द्यावे.

४) बैठकीत - विद्यार्थ्यांच्या परीक्षेसंबंधीच्या शिक्षासूचीचे व उत्तरपत्रिकेच्या मुखपृष्ठामागील सूचनांचे वाचन करण्यात यावे. तसेच मंडळाने सूचविलेल्या नमुन्यातील **परीक्षेत गैरमार्ग करणार नाही** अशा आशयाची शपथ / प्रतिज्ञा **शाळास्तरावर** विद्यार्थ्यांना देण्यात यावी.

५) बैठकीत - राज्यमंडळाने मुख्याध्यापक, प्राचार्य, शिक्षक, विद्यार्थी व पालक यांचे सोयीसाठी MSBSHSE हे Android Mobile Application विकसीत केले असून सदर मोबाईल ॲप Google Play Store मधून Download करून घेण्याबाबत सूचना देण्यात याव्यात.

६) दुसऱ्या टप्प्यात लेखी परीक्षेच्या पहिल्या दिवशी सर्व विद्यार्थ्यांना केंद्रसंचालकांनी **केंद्रस्तरावर** एकत्रित करुन परीक्षेस प्रविष्ट होण्यापूर्वी (सकाळी १०.०० पूर्वी) **परीक्षेत कोणताही गैरमार्ग करणार नाही** अशा आशयाची शपथ देण्यात यावी.

७) शैक्षणिक वर्ष सन २०२४-२०२५ करीता नोंदणी शुल्क, शिक्षण संक्रमण शुल्क, शिक्षक पॅनेल माहिती, सांकेतांक नुतनीकरण शुल्कासह प्रस्ताव याची पुर्तता दि.३१ डिसेंबर २०२४ अखेरपर्यंत करावी. नोंदणी शुल्क, शिक्षण संक्रमण शुल्क, शिक्षक पॅनेल माहिती याची पुर्तता मुदतीत न झाल्यास परीक्षार्थ्यांची प्रवेशपत्रे अशा शाळांना उपलब्ध होणार नाहीत. त्याची जबाबदारी संबंधित शाळाप्रमुखांवर निश्चित होईल. त्यामुळे होणाऱ्या विद्यार्थ्यांच्या संभाव्य शैक्षणिक नुकसानीस सर्वस्वी मुख्याध्यापक व प्राचार्य जबाबदार राहतील याची नोंद घ्यावी.

८) दिव्यांग विद्यार्थी प्रस्ताव, आवेदनपत्र रद्द प्रस्ताव, चित्रकला/ शास्त्रीय कला/ लोककला प्रस्ताव, खेळाडू प्रस्ताव, अतिविलंब आवेदनपत्रे इ. मंडळ कार्यालयास विहित मुदतीत सादर करावेत.

९) विभागीय मंडळाने जिल्हास्तरावर विद्यार्थी, पालक, शिक्षक यांच्याकरीता ऑनलाईन उद्बोधन वर्ग आयोजित केल्यास शाळाप्रमुखांसह परीक्षेशी संबंधित सर्व घटकांनी त्या कार्यक्रमास उपस्थित राहणे आवश्यक राहिल.

१०) विभागीय मंडळाकडून शाळाप्रमुखांसाठी आवश्यकतेनुसार ऑनलाईन सभा आयोजित करण्यात येतील त्यास शाळाप्रमुखांनी आवश्यक माहितीसह स्वत: उपस्थित राहणे आवश्यक आहे.

११) परीक्षा केंद्र असलेल्या शाळा / क.महाविद्यालयात आवश्यक असलेल्या सुविधा - सर्व वर्गखोल्यामध्ये व शालेय आवारात चालू स्थितीतील CCTV कॅमेरे, आवश्यक संख्येइतके बेंचेस, वीजदिवे, पंखे, पिण्याच्या पाण्याची सुविधा, स्वच्छतागृहाची उपलब्धता, संरक्षक भिंत, खिडक्यांची दुरुस्ती व जाळी बसविणे, वीजेसाठी पर्यायी व्यवस्था म्हणून जनरेटर अथवा इनव्हर्टर इ. यांची उपलब्धता दि.१०/०१/२०२५ पर्यंत करणे अनिवार्य राहिल. विभागीय मंडळ अधिकारी अथवा वरिष्ठ अधिकारी या कालावधीत आकस्मित भेट देतील. या कालावधीनंतर उपरोक्त सुविधांची उपलब्धता आढळून न आल्यास संबंधित शाळाप्रमुखांविरुध्द कारवाई प्रस्तावित करण्यात येईल.

१२) राज्यमंडळाच्या व विभागीय मंडळाच्या संकेतस्थळास नियमितपणे भेट द्यावी. शिवाय MSBSHSE या ॲपचा वेळोवेळी उपयोग करावा.

**( सुभाष रा.चौगुले )**
**विभागीय सचिव,**
**कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर**

**सोबत** - 1. बैटकीसाठी आवश्यक असलेली पी.पी.टी.
2. आवश्यक शासन निर्णय व परिपत्रकांचे फोल्डर

**प्रत माहितीस्तव सविनय सादर** - मा.सचिव, राज्यमंडळ, पुणे

प्रत कार्यवाहीस्तव - 1. विभागीय शिक्षण उपसंचालक, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर
2. शिक्षणाधिकारी (माध्य.), जि.प., सातारा, सांगली, कोल्हापूर